|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव, दि. १२ (प्रतिनिधी) : विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला, संशोधनवृत्तीला आणि नवकल्पनांना व्यासपीठ उपलब्ध करून देणारी बहुप्रतिक्षित 'आविष्कार' स्पर्धा शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये पुन्हा एकदा ज्ञान, कल्पकता आणि संशोधनाचा जागर रंगविण्यास सज्ज झाली आहे. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या वतीने धुळे, जळगाव व नंदुरबार या तीनही जिल्ह्यांत जिल्हास्तरीय, तसेच विद्यापीठ परिसरात स्वतंत्र आविष्कार स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेच्या पोस्टरचे प्रकाशन माननीय कुलगुरू प्रा. विजय माहेश्वरी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, आविष्कार समन्वयक प्रा. सुरेखा पालवे, विद्यार्थी विकास अधिकारी, अधिसभा सदस्य अमोल मराठे , विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. प्रविण महाले तसेच आविष्कार सहसमन्वयक प्रा. अमरदीप पाटील उपस्थित होते.

विद्यार्थ्यांच्या मनातील कल्पनांना संशोधनाची दिशा देणाऱ्या या स्पर्धेचे आयोजन तीनही जिल्ह्यांमध्ये विविध केंद्रांवर करण्यात आले आहे. धुळे जिल्ह्याची जिल्हास्तरीय आविष्कार स्पर्धा ५ ऑक्टोबर २०२६ रोजी शिरपूर येथील एस. पी. डी. एम. महाविद्यालयात, तर नंदुरबार जिल्ह्याची जिल्हास्तरीय आविष्कार स्पर्धा ५ ऑक्टोबर २०२६ रोजी नवापूर येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात संपन्न होणार आहे.

तसेच जळगाव जिल्ह्याची जिल्हास्तरीय आविष्कार स्पर्धा ८ ऑक्टोबर २०२६ रोजी मुक्ताईनगर येथील श्रीमती जी. जी. खडसे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात होणार आहे. त्यानंतर ९ ऑक्टोबर २०२६ रोजी विद्यापीठ परिसरात विद्यापीठस्तरीय आविष्कार स्पर्धा संपन्न होणार आहे.

विद्यार्थ्यांच्या संशोधनात्मक दृष्टिकोनाला चालना देणे, त्यांच्या कल्पकतेला वाव देणे आणि नावीन्यपूर्ण संकल्पनांना प्रोत्साहन देणे हा या स्पर्धेचा प्रमुख उद्देश आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी या ज्ञानोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन विद्यापीठाच्या वतीने करण्यात आले आहे.

आविष्कार स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांची सहभाग नोंदणी ११ सप्टेंबर २०२६ पासून सुरू होणार असून २५ सप्टेंबर २०२६ ही नोंदणीची अंतिम तारीख राहणार आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी निर्धारित कालावधीत नोंदणी करून या ज्ञान आणि संशोधनाच्या पर्वात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

याबाबतची माहिती विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. प्रवीण महाले यांनी दिली. विद्यार्थ्यांच्या प्रतिभेला संधी देणाऱ्या या आविष्कार पर्वामुळे तीनही जिल्ह्यांतील महाविद्यालयीन परिसरात संशोधन, नवकल्पना आणि सर्जनशीलतेचा उत्साह निर्माण होणार असून, ५, ८ आणि ९ ऑक्टोबरला उत्तर महाराष्ट्राच्या शैक्षणिक अवकाशात 'आविष्कार'चा अनोखा रंग भरला जाणार आहे.

---

कबचौउमवि / १६/ जनसंपर्कविभाग / २०२६      दि. १२ सप्टेंबर, २०२६

प्रती,
मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया,उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी,ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता